मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १३७ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०२४

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

'हितगुज'चा मार्च महिन्याचा अंक 'संमेलन विशेषांक' काढायचा, असे ठरविले आहे. मराठे परिवाराचे १२वे अखिल भारतीय संमेलन कणकवली, (सिंधुदुर्ग) येथे दि. ६ व ७ जानेवारी २०२४ ला कनेडी रोड येथील वाळकेश्वर मंगल कार्यालयात संपन्न झाले. प्रकृती अस्वास्थामुळे आम्हा उभयतांना (मी व श्री. प्रभाकर) संमेलनाला उपस्थित राहता आले नाही. त्याविषयी हळहळ वाटते. आपले ज्येष्ठ कुलबांधव श्री. मोहनराव मराठे संमेलनात उपस्थित होते. कणकवलीहून आल्यावर त्यांनी संमेलन फारच छान साजरे झाले असे सांगितले. ते ऐकून मोठा आनंद वाटला. असो.

संमेलन आपण का भरवितो? त्या पाठीमागचा हेतू काय? असा प्रश्न मनात आला तर त्याला उत्तर 'मराठे प्रतिष्ठान'ची भरलेली संमेलने पाहावीत. आतापर्यंत १९९० ते २०२४ या काळात एकूण बारा (म्हणजे एक डझन) संमेलने 'मराठे प्रतिष्ठान'ने भरविली आहेत आणि ती मोठ्या दणक्यात दिमाखात संपन्न झाली आहेत.

'मराठे प्रतिष्ठान'चे १ ले संमेलन दि. २६ व २७ जानेवारी १९८० रोजी गोव्यातील ढवळी (ता. फोंडा) येथे वामनेश्वर मंदिरात संपन्न झाले. २ रे संमेलन दि. २९-१०-१९८० ला, दादर (मुंबई) येथे, तिसरे संमेलन दि. २२ व २३ फेब्रु. ८६ ला मुळगाव, गोवा येथे पार पडले. चौथे संमेलन ज्ञानेश मंगल कार्यालय, पुणे येथे दि. २१ व २९ नोव्हेंबर ८७ ला, पाचवे संमेलन याच ठिकाणी १९, २० जानेवारी ९६ मध्ये पार पडले. ६ वे संमेलन रत्नागिरीला ४ ऑक्टोबर, ७ वे संमेलन ज्ञानेश मंगल कार्यालय, पुणे येथे दि. २२ ते २४ डिसेंबर २००३, ८ वे संमेलन गोवा-बिंबल-सत्तरी येथे ३० एप्रिल ते १ मे २००५ ला पार पडले. ९ वे संमेलन दुर्ग, उडिपी, कार्कल - कर्नाटकात १ ते ३ मे २००९ ला, १० वे संमेलन सांगली येथे खरे मंगल कार्यालयात, दि. २३ आणि २४ जानेवारी २०१६ ला पार पडले. ११ वे संमेलन बडोदा येथे २०१८ मध्ये आणि बारावे संमेलन कणकवली येथे दि. ६ व ७ जानेवारी २०२४ ला मोठ्या थाटामाटात उत्साहाने संपन्न झाले.

या संमेलनात 'मराठे प्रतिष्ठान'च्या सभासदांमध्ये, मराठे परिवारातील कुलबांधवांमध्ये परस्पर सहकार्याची भावना जोपासली जावी, आत्मीयता व प्रेम वाढीस लागले. एकमेकांचा परिचय होऊन त्यांचे कार्य कळावे, गरजू, अडचणीत असेल तर त्यास साहाय्य करावे, मराठे प्रतिष्ठानचे सभासद करून घ्यावे, संमेलनात कलाकारांना आपली कला सादर करायला वाव मिळावा, ज्येष्ठांचे सत्कार करावेत, माहेरवाशिणींचे माहेरपण प्रेमाने करावे, स्मरणिका प्रकाशित करावी इ. अनेक महत्त्वाची कार्ये संमेलनाच्या माध्यमातून होताना दिसतात म्हणून संमेलने भरविणे आवश्यक ठरते. कोकणातील या संमेलनात वर उल्लेखिलेली सर्व कार्ये यशस्वीपणे पार पाडली. संमेलन यशस्वी करण्यासाठी कोकणातील स्थानिक कुलबांधव, म. प्र. अध्यक्ष, कोषाध्यक्ष, कार्यकारिणीतील सदस्य यांनी भरपूर कष्ट घेतले. विशेष योगदान मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. हेमंत मराठे आणि त्यांचे भाऊ श्री. शरद मराठे यांचे आहे. वेंगुर्ले येथील

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ • इ-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

‘किरात’ची संपादिका आपली कुलभगिनी सौ. सीमा शशांक मराठे यांनी संमेलनाची आठवण म्हणून स्मरणिका प्रकाशित केली हे उल्लेखनीय आहे. ज्यांनी ज्यांनी कुलसंमेलन यशस्वी करण्यास हातभार लावला त्या सगळ्या कुलबांधव-भगिनींचे कौतुक करते. ते आपलेच आहेत म्हणून त्यांचे आभार न मानता त्यांना परके करीत नाही. पण शाबासकीची थाप मारून त्यांचे अभिनंदन करते. जाहिरातदारांचे व देणगीदारांचे आभार मानते आणि सर्व कुलबांधवांना होळी आणि गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देते.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. ११ मार्च, २०२४)

भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

---



# मराठे परिवाराचे १२वे अखिल भारतीय संमेलन

## कणकवली येथे दि. ६ व ७ जानेवारी २०२४



# संमेलनाचा आढावा

♦ विजय मराठे, कार्याध्यक्ष मराठे प्रतिष्ठान

भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९

नमस्कार

प्रथमतः सर्व कुलबांधव व भगिनी, देणगीदार, जाहिरातदार, नवीन सभासद कुलसंमेलनाला उपस्थित असलेल्या कपी गोत्रीय मराठे परिवारातील सर्वांनाच मनापासून धन्यवाद. आपले कुलसंमेलन यशस्वी करण्यात आपले बहुमूल्य सहकार्य लाभले.

आपली वार्षिक सर्वसाधारण सभा १४ ऑक्टोबर २०२३ रोजी पुण्यात झाली अध्यक्षीय भाषणात श्री. कालीदास यांनी आपले कुलसंमेलन २०१८ नंतर होऊ शकले नाही एवढेच बोलले त्यावर कार्यवाह श्री. हेमंत यांनी उत्तर दिले कोणी जर कुलसंमेलन आयोजित करणार असतील तर 'मराठे प्रतिष्ठान' त्याचे मागे उभे राहील.

या करता प्राथमिक चाचपणी केली गेली. आतापर्यंत तळ कोकणातत कुलसंमेलन झालेच नाही. त्यावर माझी व हेमंत याची चर्चा झाली त्यांनी कणकवली येथील काही सभासदा सोबत संपर्क साधला गेला नंतर काही जागा उपलब्ध झाल्या त्यानुसार प्राथमिक बोलणीस सुरुवात झाली. योग्य त्या जागे करता हालचाल सुरू झाली. काही जागांची सविस्तर माहीती उपलब्ध झाल्यावर आपले कार्योपाध्यक्ष सध्या बरेचदा पुरळ येथे जात असतात त्यांनी प्राथमिक माहितीनुसार मी, हेमंत व शैलेंद्र २१ नोव्हेंबर २०२३ ला सर्व ठरवण्याकरता कणकवली येथील वाळकेश्वर कार्यालयाच्या मालकांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली सर्व गोष्टी ठरवण्यात आल्या.

यात कुलबांधव व भगिनी सभासद याच्यासोबत कार्यवाह श्री. हेमंत यांनी संपर्क साधून कानोसा घेत सर्व अंदाजपत्रक तयार करण्यात आले यात मी कच्चा होतो पण काही सार्वजनिक कामातील अनुभव पाठीशी असल्यामुळेच हेमंतना माझी तसेच शैलेंद्र दोघांची खुपच मदत झाली.

१ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या विश्वस्त व कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये सर्वांना संमेलनाबद्दल सविस्तर माहिती दिली व मौल्यवान सूचना दिल्या गेल्या व त्यानंतर संमेलनाच्या आखणीला जोरदार सुरुवात झाली.

घरातील एखादे लग्न कार्यवाह असल्यासारखं मी हेमंत शैलेंद्र दररोज रात्री फक्त कसे नियोजन करायचे यावर बोलत होतो.

काय तयारी आवश्यक आहे याच्या नोंदी मी व हेमंत ठेवत होतो त्यानुसार अंदाजे किती सभासद येतील त्याच्या निवासाची, चहापान, भोजन, वाहतुकीच्या सोयी कोणत्या गाड्या कोकणात जातात याची उपलब्धता हेमंत जातीने माहीती देत होता. जाहिराती व देणग्या कुलसंमेलन उपस्थितांची वर्गणी बँकेत जमा होऊ लागली यावर कोषाध्यक्ष श्री. अनंत राव तसेच कार्यवाह कार्योपाध्यक्ष अध्यक्ष बारकाईने नजर ठेवून होते.

जाहिरातीचा उदंड प्रतिसाद पाहून १० डिसेंबर नंतर येणाऱ्या जाहिराती थांबवाव्या लागल्या त्यानुसार स्मरणिकेची पुढील वाटचाल चालू झाली. स्मरणिका नमुन्या दाखल तयार झाली व शेवटी २ जानेवारीला पुर्ण स्मरणिका आमच्यापर्यंत पोचली.

कुलसंमेलनाकरता चहापान व भोजनाची कुपने, ओळख पत्रे, कार्यकारी मंडळाकरता बॅचेस, सत्कार्थीकरता भेट वस्तु, श्रीफळे, सुवासिनी करता ओटीचे साहित्य, नोंदणी करता लागणारे सर्व साहित्य, कुलसंमेलनाच्या कामाची विभागणी व नेमणुका, या सर्व बाबींची खातरजमा करून विश्वस्त अध्यक्ष, कार्योपाध्यक्ष, कार्यवाह, कोषाध्यक्ष, ५ जानेवारीपासून कणकवलीत जमा होऊ लागले.

कुलसंमेलनाची घोषणा करणे व कार्यवाही करणे हे खुपच अवघड शिवधनुष्य 'मराठे प्रतिष्ठान'च्या सर्व विश्वस्त अध्यक्ष कार्यवाह कार्योपाध्यक्ष, कोषाध्यक्ष तसेच कार्यकारी मंडळातील बहुतेक सर्वच कामाला लागले होते. जो तो नेमून दिलेली कामे चोख बजावत होते. आपले कणकवली येथील कुलबांधव श्री. भालचंद्र मराठे याचे एक वसतिगृह आहे ते उपलब्ध करून दिले हॉटेलपेक्षा ही छान सोयी होत्या.

यात नियोजनात अनंत अडचणी आल्या काही नेमणुका केलेल्या काही सभासदांकडून वैद्यकीय कारणांमुळेच उपलब्ध होऊ शकले नाहीत आयत्या वेळेस अनपेक्षितपणे कुलबांधवांनी जवाबदारी यशस्वीपणे निभावली गेली.

कुलसंमेलनाला जवळपास १६० कुलबांधव व भगिनी उपस्थित होते. यात विशेष म्हणजे बरेच वृद्ध सपत्नीक उपस्थित होते. तरूणाचा पण सहभाग चांगला होता. चहा नाष्टा, भोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, परस्पर ओळख उपस्थिताचा एक सामुहिक फोटो आठवण म्हणून काढला. जे उपस्थित होते त्यांनी मनापासून आनंद घेतला. पण आता जेव्हा 'हितगुज कुलसंमेलन विशेषांक' पाहीला की त्यांना मनापासून वाईट वाटेल.

आगामी कुलसंमेलना करता कोल्हापूर, शिरसी कारकल (कर्नाटक) गोवा येथून प्रस्ताव आले आहेत. जसजशी माहीती उपलब्ध झाली की आपल्यापर्यंत पोचवण्यात येईल.

माझ्या अध्यक्षपदाच्या कालावधीतील हे पहिलेच कुलसंमेलन होते त्यामुळे फारच उत्सुकता होती.

फारच कमी ६० दिवसात हे कुलसंमेलन निर्विघ्न पार पाडण्यात खरोखरच आपले कार्यवाह श्री. हेमंत यांचा मोठा वाटा होता. त्यांना सर्व कार्यकारी मंडळातील सदस्यांकडून प्रामाणिक सहकार्य मिळाले.

परत एकदा सर्व कुलबांधव, देणगीदार, जाहिरातदार, सभासद, हितचिंतक सर्वांचे अध्यक्ष या नात्याने मनःपूर्वक धन्यवाद. ♦









# विश्वस्तांचे मनोगत

♦ DK - **भाग्यश्री** **भ्रमणध्वनी : ९९७७६००१०१**

कोकणात कणकवलीला १२ वें कपीगोत्री कुलबांधवांचे संमेलन आयोजित करायचे असे ठरले त्यावेळी खुप आनंद झाला. पण एक विवंचना होती दिवस फारच कमी होते व एवढ्या मोठ्या प्रमाणात आयोजन करायचे असेल तर भरपूर तयारी करावी लागते. ती जबाबदारी हेमंत, विजय, शैलेंद्र, आणि स्थानिक कुल बांधवांनी आपल्या खांद्यावर घेऊन एक अत्यंत सुंदर, नेत्रदीपक सोहळा पार पाडला.

कणकवली ठिकाण मध्यवर्ती असल्याने ३०/४० किलोमिटर परिसरातील कुल बांधव, गोवा आणि कर्नाटकचे कुल बांधव ह्यांना फार सोयीचे पडले. श्री वाळकेश्वर मंगल कार्यालयाची निवड उत्तम होती. तिथला भव्य परिसर फारच निसर्ग सुंदर आणि स्वच्छ होता. दोन्ही दिवस रुचकर कोकणी पदार्थांचा आस्वाद सर्वांनी उपभोगला. आपले कर्नाटक मधील कुलबंधु श्री. नागभूषण मराठे आम्ही त्यांना दक्षिण कर्नाटकचे चितळे बंधू म्हणतो त्यांनी सर्वांच्या स्वागतासाठी नारळ बर्फी आणि जेवणात पुरण पोळ्या आणल्या होत्या. आपले हरकुळचे कुलबंधु श्री. सुरेश राजाराम ह्यांनी आलेल्या पाहुण्यांची निवास व्यवस्था केली होती. मजेची गोष्ट, सोय जास्त लोकांची होती. आपली संख्या थोडी कमी पडली.

एवढ्या कमी वेळात स्मरणिका काढायचे म्हणजे एक फार मोठे आव्हान होते. ते हेमंत, सौ. सीमा शशांक, सौ. अंजली आशुतोष यांनी स्वीकारले. मुंबई, वेंगुर्ला, बरोडा ह्यांच्याशी डिजीटल समन्वय साधुन अत्यंत सुंदर ‘स्मृतिगंध हितगुज अंतरीचे’ हि स्मरणिका विमोचन करून सर्व कुल बांधवांना संमेलनात वितरित झाली.

दोन दिवसाच्या कार्यक्रमात वेगवेगळ्या वक्त्यांनी विविध विषयांवर बोधप्रद माहिती दिली. जसे निर्माण क्षेत्र, विपणन क्षेत्र, परमाणु – संरक्षण क्षेत्र, करिअर समुपदेशन, निसर्गोपचार इत्यादी.

श्री. श्रीनिवास मराठे मुंबई यांनी आपला डिजीटल कुल वृत्तान्त कुठपर्यंत आला आहे ह्याचा आढावा सांगितला.

आपली काळाच्या ओघात लुप्त होत असलेली मायबोली ‘चित्तपावनी’. कर्नाटक मधील आणि गोव्या मध्ये पण काही जण अजून घरी चित्तपावनी भाषा बोलतात. सौ. अपूर्वा शिवराम, कर्नाटक कुलबंधु ह्यांनी ही भाषा त्यांच्याकडून ऑनलाईन शिकवण्याची तयारी दाखवली.

कपीगोत्रीय अनेक क्षेत्रात उच्च शिखरावर आहेत आणि सर्वोतोपरी मदत करायला तयार आहेत.

श्री. श्रीनिवास (पुरळ)सारखा उत्तम मंच सूत्रधार, गायक ह्याच सोहळ्यात गवसला. सर्व लहान मुला-मुलींनी गायलेली गाणी, केलेली नृत्य अप्रतिम होती. संध्याकाळी स्थानिक कलाकारांनी सादर केलेली नाटिका जणू ‘सोनेपे सुहागा...’ आपल्यातील कलाकार आपणहून पुढे येऊन आपली कला, काही आठवणी, गाणी, सादर करत होते. एकूणच पुर्ण सोहळा हा ‘आम्ही सारे कपीगोत्री बांधव’ असा होता. प्रत्येकाची ओळख करून द्यायचा कार्यक्रम खुप छान झाला. सर्व जण भरभरून बोलले, जवळीकता वाढली आणि एक कुटुंब हि भावना दृढ झाली.

असा सोहळा साजरा करायचा म्हणजे भरपूर आर्थिक बळ लागते. सर्व कुलबांधव, जाहिरातदार, आलेल्या देणग्या ह्यातून हा सोहळा व्यवस्थित पार पडला. ‘मराठे प्रतिष्ठान’चे संस्थापक कै. सुरेश भाऊ ह्यांचे स्वप्न साकार झाले.

अजुन एक उल्लेख करावा वाटतो आपले श्री. मोहनराव मराठे मुंबई, अरूण दत्तात्रय पुणे, संस्थापक सदस्य, वयाची ८०-८२ वर्षे उलटून गेली तरी सोहळ्यास उत्साहाने हजर होते.

प्रत्येकाचा नामनिर्देश करणे थोडे अवघड आहे पण सोहळा यशस्वी करण्यास हातभार लावणाऱ्या प्रत्येकाचे मन:पूर्वक अभिनंदन आणि आभार.

७ तारखेला दुपारनंतर अत्यंत आनंदी पण भारावलेल्या मनानी एकमेकांचा निरोप घ्यायला सुरुवात झाली.

१३ व्यां संमेलनाला पुन्हा भेटूया.....बघूया कुठे ठरते ते....

♦

# संमेलनाची पार्श्वभूमी

♦ हेमंत अरुण मराठे (पृ. २१) भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०

कपि गोत्री मराठे परिवाराचे 'मराठे प्रतिष्ठान मुंबई आयोजित १२ वे अखिल भारतीय संमेलन' कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग येथील वाळकेश्वर मंगल कार्यालयात दिनांक ६ व ७ जानेवारी २०२४ असे पूर्ण दोन दिवस आयोजित करण्यात आले होते. संमेलनाची घोषणा ऑक्टोबर अखेरीस करण्यात आली व फक्त दोन महिन्यांत हे संमेलन यशस्वीपणे आयोजित करण्यात आले.

**या संमेलनाचा गोषवारा पुढीलप्रमाणे.**

परिवाराचे अखिल भारतीय संमेलन म्हटले की त्याची तयारी खूपच काळजीपूर्वक करावी लागते. साधारण बडोदा संमेलन २०१८ साली यशस्वी झाल्यानंतर मी स्वतः यासाठी प्रयत्न करणे सुरू केले. बरेचजणांची इच्छा होती की आपण सर्व मराठे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील मूळचे तेव्हा कणकवली येथे संमेलन घेतले तर लोकांना त्या कारणाने आपल्या मूळ ठिकाणी जाता येईल. आता यासाठी मुळात स्थानिक पातळीवरील परीवारांनी पुढाकार घेणे अपेक्षित असते व त्याअनुषंगाने तेथील काही स्थानिक मराठे व्यक्तींबरोबर संपर्क साधून संमेलनाबद्दल सांगितले तसेच तीन चार वेळा प्रत्यक्ष भेटून सर्व माहिती दिली, संमेलन कशाप्रकारे करायचे असते ते सांगितले व त्यावेळी त्यांनी करुया असे सांगितले. वारंवार मी संपर्क साधून होतोच. मात्र शेवटी आम्हाला शक्य होणार नाही असे सांगितले. आम्हाला तर संमेलन घ्यायचेच होते. कार्यकारिणी सभेतही चर्चा झाली होती, यासंबंधीची. अध्यक्ष, उपाध्यक्ष व मी कार्यवाह आम्ही म्हटलं आपणच का आयोजित करू नये? आणि मग पटापट कार्यवाहीला सुरुवात झाली. एक हॉल नक्की केला पण तो योग्य नव्हता मग तो रद्द करून दुसरा निसर्गाच्या सान्निध्यात घेतला. सोबत कणकवली येथील अमित मराठे होता, त्याने पूर्ण साथ द्यायची तयारी दाखवली. संमेलन करायचं तर झोकात. आमंत्रणं सुरू केली. एका बाजूने स्मरणिकेची तयारी सुरू केली व यासाठी वेंगुर्ले येथील किरात साप्ताहिकाच्या संपादिका सौ सीमा मराठे यांनी व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून पूर्ण जबाबदारी घेतली. कमी वेळेत यासाठी लेख गोळा करणे, जाहिराती घेणे आपापले व्यवसाय सांभाळून, हे सोपे काम नव्हते. संमेलनाअगोदर दोन खेपा घालाव्या लागल्या, कणकवली येथे. दुसऱ्या भेटीत बराचसा भार हलका झाला कारण स्थानिक श्री सुरेश मराठे यांची भेट झाली. ते स्वतः स्टेशनवर घ्यायला आले व बऱ्याचशा मराठे परीवारांची भेट करून दिली. स्वतः मोठी देणगी दिली व तेथील श्री भालचंद्र मराठे यांच्याशी ओळख करून दिली. त्यांनी रहाण्याची सोय ज्यांना बेडची आवश्यकता असेल त्यांच्यासाठी मोफत करतो असे सांगितले. स्वतः सुरेश मराठे यांनी आश्वस्त केले की मी आहे, काही काळजी करू नका. झोकात होणार संमेलन. यामुळे खूपच हलकं वाटलं.

वाळकेश्वर मंगल कार्यालय व नार्वेकर केटरर्स यांनी देखील आदल्या दिवशी येतील त्यांची पण सोय थोडक्या पैशात करायची तयारी दाखवली.

प्रत्यक्ष संमेलनाच्या वेळी कार्यालय व केटरर्स यांनी चांगले सहकार्य केले. सुरेश मराठे व भालचंद्र मराठे यांनी उत्कृष्ट साथ दिली. अमित होताच. मात्र संमेलनाचे अध्यक्ष सौ उज्वला चक्रदेव व प्रमुख उपस्थिती असणारे श्री मिलिंद मराठे हे दोघेही आयत्या वेळी येणार नाहीत असे कळले. मग काय? एकच, ज्यांना खरच यायची इच्छा होती ती मंडळी लांबून लांबून आली होती मग तीच आमच्यासाठी मुख्य. त्यातीलच एकेकाला पुढे मुख्य बनवून कार्यक्रम करत गेलो व उपस्थित परीवारांनी इतकी उत्तम साथ दिली की काही विचारुच नका.

सीमा मराठे यांनी स्मरणिकेचे कार्य अतिशय सुंदर प्रकारे केले. हि स्मरणिका आजपर्यंतच्या सर्व संमेलनामध्ये उजवी ठरली. मुखपृष्ठापासूनच स्मरणिकेचे वेगळेपण दिसून येते. अंजली मराठे, बडोदा यांची कविता सीमा मराठे यांनी मुखपृष्ठावर सुंदर रित्या सजवली. खूपच छान.

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे नवनवीन लोक यावेळी उपस्थित होते. तरुणांचा सहभागही उत्तम होता. कार्यकारिणी सदस्यांनी एकत्रित पणे काम करून, हे संमेलन यशस्वी केले. सर्व सहकार्यांचे खूप खूप आभार.

सविस्तर वार्तांकन सौ अपूर्वा मराठे, गोवा यांनी केले आहे ते अवश्य वाचा.

♦

















# १२वे अखिल भारतीय कपी गोत्री मराठे कुटंबाचे संमेलन

## ६ व ७ जानेवारी २०२४

◆ अपूर्वा मराठे (पृ. ५३१), गोवा फोंडा

भ्रमणध्वनी : ९५२७४३५९४१

**पूर्वपीठिका / पूर्वारंभ**

चित्पावन ब्राह्मण ही पोटजात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. आम्ही अस्सल भारतीय आहोत असे एकीकडे सांगणारे चित्पावन त्याच वेळी आपले मूळ शोधण्यासाठी खटपट करताना आढळतात. अनेक मराठी लेखकांच्या मते चित्पावन या दैदीप्यमान कामगिरी करणाऱ्या पोटजातीबद्दल अधिक चर्चा आणि संशोधन व्हावे, कारण कुलवृत्तांतात ग्रथित करणारी महाराष्ट्रातील एकमेव जात म्हणजे चित्पावन. अर्थातच त्यांची व्याप्ती ४०० वर्षांपेक्षा कमी कालखंडाची आहे.

चित्पावन मराठे प्रतिष्ठानची स्थापना करण्यामागे अतिशय सोपी, सरळ अन तरीही उत्तम अशी चार उद्दिष्टे आहेत. १) संमेलन २) मुखपत्र 'हितगुज' ३) कुटुंबातील सर्वांना सहाय्य व ४) सर्वांच्या विकासासाठी एकत्र यायचे आणि याद्वारे भारतातील व जागतिक पातळीवर एकीच्या, बुद्धिमत्तेच्या बळावर मराठे परिवार आणि पर्यायाने चित्पावनांचा झेंडा सदैव मानाने फडकत राहावा. या सर्व गोष्टी नवीन पिढी समोर आदर्श ठेवणाऱ्या आहेत.

ह्याच उद्देशाने दिनांक ६ व ७ जानेवारी २०२४ रोजी, १२ वे अखिल भारतीय कपी गोत्री मराठे संमेलनाचा मानस झाला. मराठे कुटुंबातील बहुतेक मूळ घरे ही कणकवली भागात आहेत म्हणून याच निसर्गरम्य परिसरातील कनेडी रोड येथील वाळकेश्वर मंगल कार्यालयात संमेलन आयोजित करण्याचे ठरवले. दोन दिवसांचे भरगच्च कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी सर्व कार्यकारिणी सदस्य ऑक्टोबर पासून तयारीस लागले होते. पाच तारखेलाच मुंबई, छत्रपती संभाजी नगर, कारकळ, शिरसी कर्नाटक, पुणे, अंबरनाथ वगैरे ठिकाणाहून मंडळी येऊन पोहोचली. काही कार्यालयात तर काही हरकूळ वाड्यावरील भालचंद्र मराठ्यांकडे वास्तव्यास थांबली आणि संमेलनाची लगबग सुरू झाली. विजय, हेमंत, शैलेंद्र, अशोक, अनंत मराठे, तसेच राहुल व चंद्रशेखर विद्वंस, यांची लगबग सुरू झाली होती. शनिवारी सकाळी सात वाजल्यापासूनच नोंदणी सुरू झाली. बाहेर गावाहून आलेली मंडळी चहा व अल्पोपहारचा आस्वाद घेत नोंदणी करत होते, आजूबाजूचा परिसर पाहत होते.

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय सुंदर अशा स्वागतगीत, भावगीत, गणेशवंदनाने झाली. अध्यक्ष प्रोफेसर उज्वला चक्रदेव,



कुलगुरू, एस.एन.डी.टी विद्यापीठ, मुंबई व प्रमुख पाहुणे प्रोफेसर मिलिंद मराठे, अध्यक्ष नॅशनल बुक ट्रस्ट काही वैयक्तिक कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे संमेलनाला सर्वप्रथम उपस्थित रहाणाऱ्या श्रीमती ममता बाळकृष्ण मराठे, साखरपा यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलनाने संमेलनाची सुरुवात झाली. किरात मासिकाच्या संपादिका सौ. सीमा मराठे यांनी तसेच कोल्हापूर येथून आमंत्रित श्री नंदकुमार मराठे यांचे शुभहस्ते संमेलनाच्या स्मृति सर्वांच्या स्मरणात राहाव्यात म्हणून 'स्मृतिगंध – हितगुज अंतरीचे' स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांनी आपल्या ओघवत्या भाषेत सुरेख मार्गदर्शन केले व काही विचार अधोरेखित केले. त्यात प्रामुख्याने, संमेलन आयोजित करण्यामागची भूमिका, परस्पर सहाय्य यावर भर दिला.

पहिल्या दिवशी साधारण १४ व दुसऱ्या दिवशी ११ तास सतत संमेलनात सर्वांची लगबग सुरू होती. कार्यवाह हेमंत यांनी ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२३ या दोन महिन्यातील संमेलनाच्या आयोजनातील पडद्यामागच्या घडामोडींची माहिती दिली. श्री नंदकुमार मराठे, कोल्हापूर यांनी अतिशय ओजस्वी भाषेत चित्पावन ब्राह्मण म्हणजे ओघाने कपिगोत्री आलेच असे कौतुक केले. आपल्या कुलबांधवांची तुलना त्यांनी भारद्वाजाशी करताना म्हटले की आपण समृद्ध आहोत, कोट्याधीश आहोत. १९५० च्या दशकात आपल्यावरील हल्ल्यामुळे आपली वाताहत झाली, तरीही आपण माणुसकीचा धर्म सोडला नाही आणि चिरंजीवी राहण्यासाठी धडपडत आहोत, भविष्यातही आपण अनन्यसाधारणच राहणार आहोत.

सौ सीमा शशांक मराठे हिचा दोनही दिवसातील संमेलनातील वावर भुरळ पाडणारा होता. तिने स्मरणिकेचे अतिशय क्लिष्ट संपादकीय काम कमी वेळेत, पण उत्तमरीत्या केले. त्याचमुळे स्मरणिका योग्य वेळी मराठे बांधवांना मिळाली. या प्रसंगी 'बालक पालक चालक' यावर नव्या दृष्टिकोनातून तिचे विचार ऐकताना तिचे कौतुक वाटले. तसेच दुसऱ्या दिवशी प्रस्तुत केलेल्या एकपात्री प्रयोगामुळे तिच्यातील कलाकाराचे दर्शन झाले आणि जणू आपल्या परिवारात एक झाकलेला हिरा गवसला.

दादरचे श्रीनिवास मराठे यांनी आपल्या खणखणीत आवाजात 'मराठी प्रतिष्ठान'चा कुलवृत्तांत, संगणक प्रणालीवर कसा विकसित केला आहे यावर मार्गदर्शन दिले, माहिती दिली. कुलवृत्तांत लिहिण्याचे फायदे-तोटे अधोरेखित करत, सर्वांनी आपापली जबाबदारी सांभाळून आपल्या पोट जातीचे सत्य, इतिहास माहिती करून घ्यावा असे सांगितले व त्यासाठी अद्ययावत संगणकीय



ज्ञानसंपदा आपल्या मदतीस आहे हेही त्यांनी सांगितलं. हा विषय क्लिष्ट आहेच, पण अत्यंत उपयुक्त आहे त्यामुळे त्यावरील विचार त्यांनी दोन सत्रात मांडले.

दुपारच्या जेवणानंतर ओळख करून घेण्याचा कार्यक्रम साधारण तीन तास रंगला. एकूण ६५ मराठे कुटुंब, मूळ पुरळ, कणकवली, वेंगुर्ला, रत्नागिरी, चिपळूण, मुंबई, ठाणे, कोल्हापूर, नगर, पुणे, अमरावती, नागपूर, अकोला, अलिबाग, बडोदा, मिरज, कर्नाटक, मध्य प्रदेश, गोवा, शिरसी राज्यातून हजर होती. सर्वात ज्येष्ठ सदस्य ममता बाळकृष्ण मराठे या साखरपा येथून कुलसंमेलनासाठी एकट्याच एसटीने आल्या. अंबरनाथ येथील एव्हरग्रीन, बायकर मराठे पती-पत्नी होते. पहिल्यांदा उपस्थिती लावणारे चार चुलत भाऊ होते. करकळ येथून केशव रत्नाकर, श्रीकर, चित्तरंजन, नागभूषण, गजानन, गीता कर्नाटक येथून आले होते. चारशे वर्षांपूर्वी मराठा पेशवाईच्या विस्ताराकरिता स्थलांतरित झालेल्या या मराठे कुटुंबाला आजही आपले कुटुंब, भाषा यांच्याविषयी आस्था आहे. मराठी प्रमाणभाषा न शिकल्याची खंत जाणवली पण त्यांनी चित्पावनी भाषेचा प्रचार केला आहे, करत आहेत हे कौतुकास्पद आहे. शिवाय येताना संमेलनातील सदस्यांसाठी खुसखुशीत पुरणपोळी तूप व खोबऱ्याच्या बर्फीची मेजवानी घेऊन आले होते, ज्याची चव आजही जिभेवर रेंगाळते आहे.

पुरळचे श्रीनिवास यांनी अगदी आयत्यावेळी सूत्रसंचालनाची जबाबदारी नेटाने पेलली. अलिबाग येथून शैलेश तर बडोदा, गुजरात येथून अंजली व आशुतोष हे जोडपं आपल्या ९० वर्षे वडिलांचा - सदाशिव बळवंत मराठे यांचा आशीर्वादपर संदेश घेऊन आले होते. उत्तम वक्ते, संघटक, उद्योजक, पालक, संयोजक, समाजसेवक असे परिमल आपल्या कुटुंबसमवेत छत्रपती संभाजीनगर येथून उपस्थित होते. मोहन काकांचे आनंदाचे झाड सर्वांना समृद्ध करून गेले. अनेक गोष्टी, वस्तूंचा संग्रह आणि अगणित अनुभवांचे भांडार त्यांनी सर्वांसाठी उघडले.

उच्चपदस्थ, उच्चविद्याविभूषित श्री जयंत व कर्नल प्रमोद आणि प्रशांत या सर्वांचीच उपस्थिती, त्यांचा साधेपणा, प्रत्येक वाक्य प्रेरणादायी होते. अशी तळमळ, आपलेपणा हे संमेलनातील प्रमुख साध्य वाटले. या वैज्ञानिकाने अतिशय क्लिष्ट पण महत्त्वपूर्ण 'अणुऊर्जा' हा विषय अगदी सोप्या सुटसुटीत भाषेत समजावून सांगितले, तसेच राजकारण्यांच्या डावपेचांना बळी न पडण्याचा रामबाण उपायही सांगितला.

कणकवली संमेलनात मनोरंजन कार्यक्रम दोन्ही दिवस उत्तम होते. विशेष लक्षात राहण्यासारखे म्हणजे स्थानिक कलाकारांनी








सादर केलेले नाटक, तसेच प्रामुख्याने स्थानिक अस्मिता, तिची लेक यांची 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात', 'कांदे पोहे' ही गाणी विशेष सुखावून गेली, तर चित्तरंजन यांचे उडत्या चालीचे 'लाखो हे या दिलवाले' भावले. डी. के. मराठे यांनी गायलेली गाणीही भन्नाट आवडली. कुल बांधवांचे नाटक, श्रीनिवासच्या मुलीचा एकपात्री अभिनय, सुहिताची ती फुलराणी, सीमाचा अभिनय, श्रेया व गायत्री यांचे नृत्य आणि सर्वात सुंदर म्हणजे तीन वर्षाच्या बाळाचे गीतच्या १५ व्या अध्यायाचे पठन.

पुढील संमेलन शिरसी, कारकळ किंवा गोवा येथे व्हावे असे सूचित करण्यात आले. खरे तर अखिल भारतीय संमेलनच्या आयोजनासाठी कमीत कमी वर्षभर अगोदर तयारी करावी लागते, पण हे संमेलन अक्षरक्ष: दोन महिन्यातच उभं राहिले व यशस्वीरीत्या संपन्नही झाले. या संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्यांचा ज्यांचा हातभार लागला त्या सर्वांचे व जे बांधव उपस्थित राहिले त्या सर्वांचे मनापासून आभार. या पुढील संमेलनात अजून काही बांधवांना भेटण्याच्या अपेक्षेत.

♦

# मराठे कुल स्नेह संमेलन

• सौ. अंजली आशुतोष मराठे (पृ. ३८०), बडोदे, गुजरात भ्रमणध्वनी : ९७२५०२२५१०

दिनांक ६ व ७ जानेवारी २०२४ रोजी कणकवली येथील निसर्गरम्य वातावरणातील वाळकेश्वर मंगल कार्यालय येथे 'मराठे प्रतिष्ठान' आयोजित कपि गोत्री मराठे कुल संमेलन संपन्न झाले. ऑक्टोबर मध्ये याविषयी पहिली घोषणा झाल्यापासून संमेलनास उपस्थित राहण्याची इच्छा मनात जागृत झाली होती. त्यानुसार रिजर्वेशनही करून ठेवले. कार्यवाह श्री. हेमंत मराठे वेळोवेळी अपडेट देत होते. पण आमचे रेल्वेचे तिकीट काही कन्फर्म होत नव्हते. खूप दूरचा प्रवास तसेच दोन वेळा गाड्यांची अदला-बदल करायची असल्याने जर तिकीट कन्फर्म झाले नाही तर आम्ही येणार नाही असे मी श्री. हेमंत मराठे यांना कळवले. जास्तीत जास्त संख्येने मराठे बंधु-भगिनींनी या संमेलनास उपस्थित रहावे अशी मनापासून इच्छा असणाऱ्या श्री. हेमंत मराठे यांनी मला श्री. राहुल विद्वांस यांचा नंबर दिला आणि CST नाही पण ठाण्याहून कन्फर्म टिकिट मिळवून देण्याचे महत्त्वाचे काम राहुल यांनी केले. त्यांचे खूप आभार. कारण त्यामुळेच आम्ही दोघे संमेलनास उपस्थित राहू शकलो.

कणकवली स्टेशन पासून अगदी जवळ असणाऱ्या वाळकेश्वर मंगल कार्यालयात ६ तारखेला पहाटे ६ वाजता पोहोचलो तर रिक्षाचा आवाज ऐकून श्री. हेमंत मराठे तिथे स्वागतास हजर. प्रवास कसा झाला वगैरे प्रेमाने चौकशी करून लगेच वाफाळता चहा घेतल्यावर जरा तरतरी आली आणि प्रवासाचा सर्व शीण पळून गेला. कोकणातील प्रसिद्ध अंबोळ्या आणि काळ्या मसूरचे सांबार असा मस्त पोटभर नाश्ता, सोबत पुन्हा चहा घेऊन उद्घाटनाच्या तयारीस लागलो.

अध्यक्ष प्रोफेसर उज्वला चक्रदेव, कुलगुरू, एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई व प्रमुख पाहुणे प्रोफेसर मिलिंद मराठे, अध्यक्ष नॅशनल बुक ट्रस्ट काही वैयक्तिक कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या विषयी माहिति तसेच त्यांचे विचार ऐकण्याची संधी हुकली. परंतु सूत्रसंचालक श्री. श्रीनिवास मराठे यांनी वेळेचा सदुपयोग करत कोणतेही औपचारिक सोपस्कार न करता अनौपचारिकरीत्या संमेलनाची सुरुवात केली. आपल्याच कुलबांधवांच्या मुली, नाती यांनी सुंदर गणेश वंदना नृत्य सादर केले. नंतर औपचारिक पद्धतीने संमेलनानिमित्ते स्मृतिगंध - हितगुज अंतरीचे या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी किरात मासिकाच्या संपादिका सौ. सीमा मराठे यांनी तसेच कोल्हापूर येथून आमंत्रित श्री. नंदकुमार मराठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

भोजनानंतर उपस्थित मराठे बांधवांनी आपापली ओळख करून देण्याचा कार्यक्रम खूप छान अन सुनियोजित पद्धतीने झाला. आपले बंधु-भगिनी कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहेत, कुशल आहेत, कुठे वास्तव्यास आहेत हे समजले. उडुपी येथून आलेल्या मराठे बांधवांचे विशेष कौतुक वाटले. चित्पावनी भाषा बोलणाऱ्यांचेही खूप कौतुक वाटले. अगदी खेळीमिळीच्या वातावरणात हा कार्यक्रम झाला.

संध्याकाळी मनोरंजन कार्यक्रमात उत्स्फूर्ततेने आपली कला सादर करणाऱ्या सर्वांचे खूप कौतुक. गाणी, एकपात्री प्रयोग, स्वगत, कविता सादरीकरण, नृत्य, लघुनटिका अशा सर्व कार्यक्रमांची रेलचेल... जणू एखादा कौटुंबिक सोहळाच... खरे तर यापूर्वी काही जणच एकमेकांना भेटले असतील पण जे प्रथमच भेटत होते त्यांच्यातही किती वर्षांपासून ओळख असेल असे संवाद होत होते.

७ तारखेला कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास मराठे यांनी मराठे कुलवृत्तान्त आणि त्याचे डिजिटलायझेशन यावर विस्तृत प्रकाश टाकला. गोवा, बंगळुरू, पुणे, ठाणे, कल्याण, मुंबई, औरंगाबाद, अमरावती, उडुपी येथून आलेल्या बांधवांनी संघटित समाजासाठी अशा संमेलनांची आवश्यकता व उपयुक्तता यावर आपापली मते मांडली. ज्येष्ठ मोहन मराठे काका यांनी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा ठेवा असलेले 'हितगुज'चे पहिले हस्तलिखित अंक 'मराठे प्रतिष्ठान'ला सुपूर्त केले. संपूर्ण संमेलनाचा आढावा गोव्याच्या सौ. अपूर्वा मराठे यांनी आपल्या आगळया वेगळ्या शैलीत मांडला. समारोपाच्या भाषणानंतर संमेलनाची सांगता सौ. सुहिता मराठे यांच्या पसायदानाने झाली. सर्वांची नावे माझ्या लक्षात नाहीत, पण या संमेलानात आपली कला सादर करणाऱ्या सर्व कलावंतांचे मनापासून अभिनंदन.

दोन दिवसांच्या या संमेलनाच्या यशस्वी आयोजनात 'मराठे प्रतिष्ठान'चे अध्यक्ष विजय मराठे, कार्यवाह हेमंत मराठे, शैलेन्द्र मराठे, सहकार्यवाह श्री अशोक मराठे, चंद्रशेखर विद्वांस तसेच राहुल विद्वांस यांचे व त्यांच्या सहकार्यांचे कमालीचे योगदान आहे. कोणतेही कार्य – मग ते छोटे असो व मोठे, प्रत्येकाचा खारीचा वाटा असल्याशिवाय संपन्न होत नाही. दोन दिवस सर्वांच्या राहण्याची उत्तम सोय होती. समारंभाचा हॉल मोठा, भोजन स्थळी व्यवस्थित बसून येथेच्छ जेवता येईल अशी व्यवस्था होती. रुचकर, सुग्रास भोजनाची, पुरणपोळी, कंदी बर्फी, उकडीचे मोदक यांची चव अजूनही जिभेवर रेंगाळत आहे. वेलची केळी, कोकम सरबत दुपारच्या उकाड्यात गारवा देऊन गेले.

एकूणच दोन दिवसांचे हे संमेलन अत्यंत आनंद आणि पुढील कित्येक दिवसांसाठी ऊर्जा देऊन गेले हे निश्चित. सर्व बडोदेकर मराठे बांधवांकडून सर्वांचे खूप अभिनंदन आणि सर्वांना खूप शुभेच्छा!

♦



















# ऋणानुबंध

• सीमा शशांक मराठे (पृ. ३९६), वेंगुर्ला
भ्रमणध्वनी : ९६८९९०२३६७

किरात दिवाळी अंक २०२३ चे काम सुरू होते. गोव्यातून कालिदास मराठे काकांचा फोन आला. मला म्हणाले, मराठे प्रतिष्ठानची १४ ऑक्टोबर २०२३ रोजी पुण्यात सर्वसाधारण सभा आहे. मी जाणार आहे. मराठे परिवाराचे संमेलन कणकवलीत व्हावे असे मला वाटते. अर्थात सिंधुदुर्गमधील मराठे मंडळींनी या सभेला यायला हवे. पण तुला यायला नाहीच मिळाले तरी तुझ्यावर काही जबाबदारी आम्ही टाकणार आहोत. आम्हाला विश्वास आहे की तू ती पूर्ण करशील. कालांतराने पुनश्च फोन आला. आणि काका म्हणाले, जानेवारी महिन्यात कार्यक्रम निश्चित केला आहे. स्मरणिकेचे काम किरात कडून व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्या संदर्भात सुनील काकांशी तू बोलून घेच. पण या कामी नालासोपारा येथील हेमंत मराठे तुझ्याशी संपर्क साधतील.

दरम्यान हेमंत सरांचा ही फोन येऊन गेला. स्मरणिकेचे स्वरूप काय असावे, त्यात काय काय अपेक्षित आहे, जुजबी बोलण झालं. मी तुम्ही निश्चिंत राहा माझ्याकडून जसं जमेल तसा मी प्रयत्न करेन असा विश्वास दिला. असे सांगून आश्वस्त केलं खरं पण मनात एकप्रकारे द्वंद्व सुरू झालं. एकाही संमेलनाला माझी व्यक्तिगत आतापर्यंत उपस्थिती नाही, या आधीच्या स्मरणिका पाहिल्या नाहीत. कसं जमणारे आपल्याला?

पण किरात नेहमीच माझ्यासाठी दिशादर्शक राहिला आहे. तो कायम मला निर्धास्त करतो. शंभर वर्षांची परंपरा आहे आपली... तू काळजी नको करुस...सर्व होणार व्यवस्थित... कोण ना कोण तुझ्या मदतीला हजर होणार... आपले ऋणानुबंध आहेत...हा आतला आवाज ऐकला मनोमन पूर्वजांचे आशीर्वाद मागितले. आणि कामाला सुरुवात करायचं ठरवलं.

हेमंत सरांनी सांगितल्याप्रमाणे लेख, जाहिराती जसं जशा त्यांच्या कडे आल्या तस तशा माझ्याकडे व्हॉट्सअँप मेसेजेस द्वारा पाठवायला त्यांनी सुरुवात केली. दरम्यान कालिदास मराठे काकांनी आधी प्रसिद्ध झालेल्या स्मरणिका नमुना म्हणून पाठवल्या. काम एकीकडे सुरू होत. दरम्यान स्मरणिकेसाठी आपण मुलाखती घेऊ असं मीच हेमंत सरांना सुचवलेल तर त्यानी त्या तुलाच घ्यायच्या आहेत अस सांगून माझ्या पोटात गोळा आणला.



एरवी समोरासमोर गप्पा मारणं वेगळं, आणि मुलाखत शब्दांकन वेगळी गोष्ट. त्यात मला संदर्भ चटकन विसरायला होतात. पण माझ्यावर माझा नवरा आणि सर्वांचाच दांडगा विश्वास तू हे करशील.. आणि सौरभ सरांना फोन केला..छान गप्पा मारल्या. गप्पा रेकॉर्डिंग करून ठेवल्या. आणि एका रात्रीत पहिली मुलाखत लिहून झाली. माझा आत्मविश्वास वाढला. किरात दिवाळी अंकात देखील मी मुलाखती घेते. गेली आठ वर्ष संपादक म्हणूनही मी हे काम करतेय. तरीही कुठलेही नवीन काम माझ्यासाठी एक नवीन प्रोजेक्ट असतो. तो प्रोजेक्ट माझ्यासाठी माझ बाळ असतं. ते आकाराला येताना, त्याला काही वेळेला आंजारून गोंजारून देखील मनासारखं होतच नाही. मग अशावेळी हेच ऋणानुबंध कामी येतात. कधी अधिकारवाणीने त्याच्या जडणघडणीत सहभागी होतात तर कधी कोणीतरी नकळत पाठीशी उभ राहतं आणि काम साधलं जात. या स्मरणिका कामाचे वेळीही मला असाच अनुभव आला.

दुसरी मुलाखत परिमल सर!! आमच्या गप्पा तर अगदी फक्कड झाल्या. या गप्पाही रेकॉर्ड करून घेतलेल्या.. आणि पहिली मुलाखत सौरभ सरांना पसंतीस उतरल्याने थोडंसं रिलॅक्स मन होतं. हेही जमणार आपल्याला. पण रेकॉर्डिंग गायब. नशिबाने मुद्दे कागदावर उतरवले होते त्याची मदत झाली. स्मरणिका प्रिंटिंग करिता पाठवण्याची तारीख जवळ येऊ लागली तरी मुलाखत शब्दांकन होईना. परिमल सरांना अगदी शेवटच्या क्षणी फोन केला. माफी ही मागितली, म्हटलं माझा आगाऊपणा झालाय खरा पण मला जसं आठवेल त्याप्रमाणे लिहिण्याचा प्रयत्न केलाय.. जे मुद्दे राहिलेत अस वाटतं आहे त्यावर पुन्हा बोलूया. त्यांनीही मोठ्या मनाने मला समजून घेतलं. किरकोळ बदल लेखनात सुचवले. पण मी प्रामाणिक पणे इथे मुद्दाम नमूद करते. सौरभ सर आणि परिमल सर यांचे कार्य खरोखरीच अतुलनीय आहे. त्याचे शब्दांकन करण्याचा माझा केवळ प्रयत्न झालाय स्मरणिकेत पण त्यांच्याकडून त्यांचा प्रवास जाणून घेणं म्हणजे खूप प्रेरणादायी आहे. आपण किती काय काय करू शकतो, किंबहुना करायला पाहिजे याची जाणीव ही होते.

अंजली ताईंनी लिहिलेली कविता वाचल्याबरोबर ही मुखपृष्ठ कविता आहे, असा मनात विचार आला. त्यासाठी स्मरणिकेचे सुचवलेले नाव सर्वांच्या पसंतीस उतरवल्यावर शेवटच्या दोन ओळी स्मरणिकेच्या नावाला उद्देशून लिहिल्या गेल्या तर मुखपृष्ठावर समर्पक ती कविता होईल. असे मनात आल्याने अंजली ताईंना तशी विचारणा केली, आणि त्यांनी क्षणाचाही विलंब न करता फोन ठेवताच चार ओळी पाठवल्या. आणि

आता सर्व पेज सेटिंग झालं. स्मरणिका प्रिंटिंग पूर्व तयार



झाली. आता हुश्श! मी आमच्या घरगुती कार्यक्रमाला पुण्यात गेले. स्मरणिका प्रिंटिंगला पाठविण्यापूर्वी हेमंत सरांना पीडीएफ पाठवली होती. काही चुका राहायला नको याकरिता. कारण मूळ जाहिराती सरांकडे होत्या. त्यामुळे मोबाईल वर पाठवलेल्या मजकुराशी मजकूर जुळत आहे ना याची खात्री फक्त इथे होत होती. पण हेमंत सर म्हणाले सीमा, पाच जाहिराती गायब. आधी पाठवलेल्या पीडीएफ मध्ये होत्या आणि फायनल पीडीएफ मध्ये त्या जाहिराती नाहीत. एसी रूम मध्ये मला घाम फुटला. म्हटल मी ऑपरेटरला कळवते आहेच. पण आता मी पुन्हा वेंगुर्ल्यात गेल्यावर पुन्हा एकदा सर्व तपासुया. ऑपरेटरनी पुन्हा सर्व सेटिंग पाहिलं. पण सेट केलेल्या जाहिरती फायनल सेटिंग मध्ये नव्हत्या. दुसऱ्या फोल्डर मध्ये जाहिराती कॉपी करून ठेवलेल्या असल्याने आम्हाला नव्याने काही करावं लागलं नाही हे जरी खर असल तरीही असलेली पान न वाढवता आहे त्या पाना मध्ये पाच जाहिराती बसविणे हे नाकात दम आणणार काम होत. मग सिंधुदुर्ग पर्यटन मधील काही फोटो कमी केले, कविताच्या सेटिंगमध्ये उलथापालथ करून एकदा जाहिराती सेट केल्या. आणि हेमंत सरांना पुन्हा पाठवला पीडीएफ. माझा सातत्याने फोनवर संवाद जरी फक्त हेमंत सरांशी होत होता पण हेमंत सर आणि विजय सर हे दोघेही मला प्रुफ रीडिंग करण्यात मदत करत होते. हे मला संमेलना दरम्यान कळले. आणखी असे कित्ती तरी आशीर्वाद माझ्या सोबत होते. मी मगाच पासून म्हणतेय ना ऋणानुबंध ते हे. विजय सर यांनी मला पाहिले नाही. ना मी त्यांच्याशी कधी संवाद साधलेला पण तरीही त्यांनी हे आपल काम आहे आणि ते होण्यासाठी पडद्यामागे राहून मला सहकार्य केलं. पाच जाहिराती नाहीत हे प्रथम त्यांच्या लक्षात आल. आणि हेमंत सरांमार्फत मला सावध केलं. असे मला माहीत नसलेल्या किती तरी व्यक्ती यात सहभागी असतील ही. या सर्वांची मी मनोमन ऋणी आहे.

माझे सासरे श्रीधर मराठे यांचा मोठ्ठा जनसंपर्क होता. माझा नवरा शशांक आणि आमचे काका मेघश्याम उर्फ सुनील यांचाही. त्यात किरातचं शंभर वर्षाचं वलय. सर्वांच्या सहकार्याने स्मृतिगंध साकारण्याचा प्रवास खरंच आनंददायी ठरला.

संमेलनात माझी उपस्थिती पूर्णवेळ नव्हती. परंतु दोन्ही दिवस उपस्थित राहण्याचा आणि कुल बांधवांची भेट घेण्याचा मी प्रयत्न केला. या निमित्ताने एका विस्तारित कुटुंबाचा भाग होता आले याचे समाधान माझ्यासाठी अधिक आहे.

माझ्यावरील या विश्वासाचे स्मृतिगंध हितगुज स्मरणिकेच्या रुपात चिरंतन राहतील पुन्हा नवनवीन ऋणानुबंधाच्या गाठी जपण्यासाठी.

मग पुन्हा कधी येताय सिंधुदुर्गात..वेंगुर्ल्यात? नेहमीच आपलं स्वागत..

♦

# भावना

मराठे प्रतिष्ठानचे १२वे कुल संमेलन कणकवली येथे यशस्वीरित्या पार पडले. कुलसंमेलन यशस्वीरित्या पाडण्याकामी श्री. हेमंत मराठे, श्री. शैलेंद्र मराठे, श्री. विजय मराठे तसेच कणकवली येथील स्थानिक मराठे बंधु भगिनींनी योगदान दिले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. श्रीनिवास मराठे यांनी लिलया पेलले. निवडलेले ठिकाण उत्कृष्ट होते. सर्वांची व्यवस्था आस्थापूर्वक केली. सगळ्यांना भेटून बरे वाटले. प्रत्येक मराठे कुटुंबातील घटकाला त्यांचा परिचय करून देण्याची संधी दिलीत. सर्वात आनंदाचा क्षण म्हणजे श्री. विजय मराठे व श्री. शैलेंद्र मराठे यांच्या पुढाकाराने मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनाला उपस्थित असलेल्याचा सामुदायिक फोटो काढण्यात आला. संमेलन आठवणीत जतन करावे असे पार पडले.

धन्यवाद!

**– ॲडव्होकेट नागेश मराठे**
९३२५२६५६०९






मराठे प्रतिष्ठान


मराठे प्रतिष्ठान


मराठे परिवाराचे १२ वे अखिल भारतीय संमेलन
आयोजित




अखिल भारतीय संमेलन






# मनोगत संमेलनाचे

♦ महेश मराठे		भ्रमणध्वनी : ९०११०१६१२६

दिनांक ६ व ७ जानेवारी २०२४ रोजी कणकवली येथे १२वें कपीगोत्री कुलबांधवांचे संमेलन यशस्वीपणे आनंदी आणि उत्साही वातावरणात पार पडले त्याबद्दल सर्व पदाधिकारी आणि स्थानिक कुल बांधव, संमेलन समिती या सर्वांचे मनापासून हार्दिक अभिनंदन!!!

कालच्या सांस्कृतिक कार्यक्रम मधील लहान मुलांचे उत्तम नृत्य, गायन, गीता अध्यायचे सादरीकारण यामुळे वातावरण उत्साही बनले.

दुर्ग आणि गोवा येथील बांधवांनी सादर केलेल्या भावगीत, नाट्यगीत गायनाने सर्व कुलबांधव मंत्रमुग्ध झाले.

स्थानिक कुल बांधवांनी आदिवासी समाजाच्या शोषणावर आधारित एक अंकी नाटकाने सर्वांनी तास भर गंभीर बनवून वास्तवतेचे दर्शन घडविले. एखाद्या व्यावसायिक नाट्य संस्थेप्रमाणे सर्व कलाकारांनी नाटक सादर केले. वेशभूषा आणि नेपथ्य अप्रतिम. सर्वांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

काल दुपारच्या भोजना नंतर गोवा येथील भगिनींनी घेतलेला योगा क्लास सर्वानाच मार्गदर्शक ठरला. सगळ्यांची दुपारची वामकुक्षीची डुलकी पळाली.

तसेच श्री. श्रीनिवास मराठे यांनी अत्यंत सोप्या भाषेत कुलवृत्तान्त ऑनलाईन कसा होत आहे आणि त्याचा उपयोग कसा होईल यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.



संमेलन घेण्यामागचे फायदे काय? हे चींत्तपावनि भाषेतील गोवा येथील भगिनींनी सादर केलेले विवेचन अप्रतिम.

शैलेश भाऊंनी केलेले सूत्र संचालन अप्रतिम. सर्व कार्यक्रम एका धाग्यात बांधून कार्यक्रमाची सुंदर पुष्पमाला त्यांनी तयार केलेली.

कोकम सरबत, अननस सरबत, चहा, कॉफी, ताक, सोलकढी ह्या पेयामुळे एनर्जी मिळत राहिली.

कालच्या अल्पोपहारमध्ये असलेला आंबोळी सोबत उसळ हा अल्पोपाहरचा बेत कोकणभूमी मध्ये आला आहात याची आठवण देऊन गेला..

आजची अळुवडी, गोड शिरा, भोजनातील अळु भाजी, सोबतीला उकडीचे मोदक म्हणजे मेजवानीच होती.

ह्या सर्वात भर पडली ती खुसखुशीत खोबरा बर्फी, पुरण पोळी वरती साजूक तूप. हा मधुर खाऊ आणला होता आपले दुर्ग येथील कुल बांधवांनी. तसेच त्यांची सांस्कृतिक वेशभूषा लक्षवेधी ठरली. हे सर्व जण प्रत्येकाला आनंद वाटत फिरत होते.

या संमेलनात बरच काही साध्य झाले. मला आदरणीय मोहन काकांचे मार्गदर्शन मिळाले. त्याच्या मुळे मागील ४ पिढ्यांची वैयक्तिक माहिती समजली. त्यांनी जपलेला हितगुज मासिकाचा आणि विश्व भ्रमंतीचां, त्यांच्या चित्र कलेचा ठेवा पहावयास मिळाला.

अणुऊर्जा प्रकल्प बाबत माहिती मिळाली.

मुख्य म्हणजे संमेलनात सहभागी तीन पिढ्याचे एकत्रित दर्शन आनंदाने पहावयास मिळाले.

अनेक मोठं मोठ्या पदावरील व्यक्तीचे अनुभव ऐकून आपल्या ज्ञानात भर पडली. मोठ मोठी पारितोषिक, सन्मान मिळूनही अत्यंत साधी राहणी कुठलाही गर्व नसलेले कुल बांधव यांचे दर्शन घडले.

पुनच्छ एकदा सर्वाचे आभार व्यक्त करून घरी परतत आहे.

श्री. हेमंत मराठे यांनी वेळोवेळी संपर्क साधून संमेलनाला येण्यास उद्युक्त केले त्यामुळे हा सर्व आनंदाचा ठेवा मला अनुभवता आला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार!! ♦

# मला भावलेले संमेलन

**◆ सुहिता मराठे**

सुहुचा सर्वांना राम राम!!

कणकवली येथे संपन्न झालेल्या आपल्या कपी गोत्रीय मराठे कुल (Cool) संमेलना बाबत माझे मत विचार :- मी फ्रिलांसिंग कलाकार, पत्रकार आणि साहित्यिक आहे, छत्रपती संभाजी नगर येथे रहाते.

याच वर्षीच्या जानेवारी महिन्यात झालेले हे कुल संमेलन मला तर अगदीं खरे खरे Cool संमेलनच वाटले!!

सुरुवातीला तिथं जातांना थोडी धाक धुक तर होतीच मनात, कारण माझी एक फॅमिली वगळता मी खरच कोणत्याच ज्ञाती समाज मराठे यांच्याशी फारशी संबंधित नव्हते. So ही माझी पहिलीच वेळ होती माझे सासरचे ज्ञाती संमेलन अटेंड करायची.

या एका संमेलनात जाऊन माझ्या ज्ञानात भर पडली, आपले समाज बांधव किती किती तळमळीनं समाजासाठी किती किती काय काय करत आहेत ते मला कळल! कसं असतं न की आपण आपल्या एका सेल्फ मेड कोषात रहात असतो, त्यालाच जग समजत असतो आणि मग जेव्हा हे असं संमेलनात आपण जातो तेव्हा या अफाट विश्वातल्या समुद्राची कल्पना येते.

आयोजन, संयोजन तसेच संमेलनातल्या कार्यक्रमांची आखणी अतिशय नेटकेपणाने केलेले होते त्याकरता सदरील मान्यवरांचे तह - दिल - से आभार!!

होय म्हणजे मला ही गोष्ट आवडली की संमेलनात मुद्दाम भरपूर खर्च करत सेलिब्रिटीजना न बोलवता आपल्याच मराठे लोकांमधील कला गुणांना वाव दिलेला होता.

भाषण, गाणी, नृत्य सारेच सादरीकरण सुंदर झालेले.

कोंकणी पद्धतीचं चविष्ट आणि पौष्टिक अन्न मिळाल्याने जिभे सोबत पोटही सुखावले. आता कोणतेही कार्य म्हंटले की नारदमुनी येऊन उपस्थिती लावणारच तशा बारीक सारीक बाबी वगळता (या वगळण्यातच खरी मौज) यापूर्वी माहेरच्या संमेलनात मी गेलेले पण माहेर असो वा सासर, संमेलनात सारखीच धमाल करायला मिळाली, मुख्य म्हणजे परकेपणा नवखेपणा कुठेही वाटला नाही. असे गेट टु गेदर्स नियमित व्हावयास हवेत. अशा ठिकाणी जाऊन परत आपापल्या रूटीन जगात येताना विलक्षण अशी एनर्जी मला मिळाली !

मराठे cool संमेलनास जाऊन आलेली सुहिता आता सानंद गाते हेची गीत,

माहेरी घारपुरेंची लाडकी सोनु,
सासरी मराठेंची आहे प्रिय सुहु!

◆





















# संवाद

•डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो. असं म्हटलं जातं की जो उत्तम संवाद साधू शकतो त्याचे शेंगदाणेही विकले जातात. अन्यथा चांगल्या संवादाअभावी एखाद्याचे काजूसुद्धा पडून राहतात. हां, व्यावसायिक आणि नेहमीच्या संवादांमधला फरक मात्र समजला पाहिजे. सर्व संवादांमध्ये मला निरागस लहानग्यांशी केलेला संवाद सर्वाधिक आवडतो. या संवादात कोणतीही अपेक्षा नसते, शब्दांची कसरत नसते, सावधपणा बाळगण्याची गरज नसते, चुकण्याची भिती नसते, स्वतःला सिद्ध करण्याची भानगड नसते नि औकातीचाही मामला नसतो. समोरचा लहानगाही बिनधास्त बोलत नि विचारत असतो. त्याचा एकूणच प्रतिसाद हा निरागस व म्हणून खूप आनंददायी असतो. निरागस, निरपेक्ष आणि निःसंदिग्ध मैत्रीमध्येही हाच संवादी भाव असतो. सावध राहून जिथे संवाद करावा लागतो ती मैत्री ही निखळ मैत्री नसते. ती एक 'फॉर्म्यालिटी' असते. हां, निखळ मैत्रीतला संवाद हा एकमेकांच्या मनांना हळुवारपणे जपणारा असावा, अशी अपेक्षा अवास्तव म्हणता येणार नाही. परंतु 'वास्तव' ते बोलण्यामागचा आपला निर्हेतुक उद्देश समजणारा मित्र जर असेल तर 'मनाला जपण्या'चेही टेंशन येत नाही. इतकी मानसिक नितळता जे मित्र नैसर्गिकपणे – सहजतेने आपल्या संवादात आचरतात, त्या मैत्रीचे किती कौतुक करावे? असे मित्र लाभणे ही मोठी भाग्याचीच गोष्ट म्हणायची! बऱ्याच मित्रांचा संवाद हा 'संस्कारी' भाषेतला असतो परंतु त्यात कृत्रिमताही असते. भाषा रांगडी पण भाव प्रेमळ, असा 'अस्सल' संवाद शहरांपेक्षा गावांमध्ये आजही दिसून येतो. जिथे मॅनर्स आणि एटीकेट्स पाळत एकसुरी संवाद केला जातो तिथे माझे मन फारसे रमत नाही. व्यावसायिक गरजेसाठी असा संवाद हा करावा लागतोच, पण तो 'व्यावसायिक मित्रां'सोबतचा बव्हंशी असतो. गावच्या मित्रांशी संवाद साधताना मात्र आपण सारेचजण प्रेमाने खूप 'पाल्हाळिक' होतो नि मग घड्याळाकडेही आपले लक्ष जात नाही! मला जिव्हाळ्याच्या मित्रांसोबत नि नातेवाईकांसोबत विनोदाचे फटाके फोडत संवाद करायला आवडतं. अशा वेळी माझा संवादातला 'वात्रटपणा' हा चरमसीमेला पोचलेला असतो. बैठकीत एखादा 'मख्ख' पाहुणा आला तरी तो हसू लागतो. विनोदी संवादाने एखाद्याचा 'एरंडेलपणा' निघून जातो अशी माझी अनुभवसिद्ध धारणा आहे! हां, या दोन व्यक्तींसोबतचा संवाद मी शक्यतो टाळतो किंवा आटोपता घेतो – १. सतत मी मी मी करणारे आणि २. हेतुपुरस्सर ठोंबेपणा करणारे!

एकतर्फी केलेला संवाद मला अजिबात आवडत नाही. शंभरपैकी नव्व्याण्णव वेळा आपण फोन करायचा, समोरचा केव्हातरी एक फोन करणार. असा जुलमाचा संवाद साधणारे मित्र आणि नातेवाईक मी आस्तेकदम दूर करत जातो. किंबहुना अशा लोकांचे आपल्या आनंदी आयुष्यात कोणतेही स्थान असण्याची गरज नसते. व्यावसायिक उमेदवारी करताना आयुष्याच्या प्रारंभिक टप्प्यात 'क्लाएंट' मिळविण्यासाठी आणि तो टिकविण्यासाठी काहीवेळा अपमानास्पद संवादाची मी चव घेतली आहे. अशा 'नाईलाजा'च्या संवाद – प्रक्रियेतून आपण सारेचजण गरजेपोटी गेलेलो असतो. मी लहान असताना किंवा माझी फारशी औकात (!) नसताना आमचे काही अगदी जवळचे नातेवाईक, शेजारी व तथाकथित मित्र माझ्या भोळ्या व गरीब आईवडिलांचा जो संवादी उपमर्द करायचे तो माझ्या मनावर प्रचंड आघात करून जायचा. आपली औकात सुधारली की मात्र या नातेवाईकांचा व मित्रांचा संवादही सुधारतो. अशा सुधारलेल्या संवादातील मतलबी बेगडीपणा पाहताना माझी प्रचंड करमणूक होते. अगदी हळूवारपणे मी या मान्यवरांना माझ्यापासून विभक्त करतो. असे करताना मी कोणताही अहिंसक संकोच वगैरे बाळगत नाही. आनंद देणारे संवाद व संवादी लोक आपल्या अवतीभवती असायला हवेत.

**संवादाने घडते – बिघडते,**<br>
**संवादी मन, तरते – फुलते.**<br>
**बलीष्ठ शब्दांचाही संवाद अपूरा,**<br>
**निखळ भाव करी संवाद पूरा!**

मनाची तार जिथे क्षणार्धात जोडली जाते तिथे नव्याने झालेला संवादही अगदी सुखकारक असतो. तार जुळलेली नसेल किंवा बिघडलेली अथवा अपूरी असेल तर मणभर संवादही

फारसा आनंद देत नाही.

'वाचिक' संवादापेक्षा 'कायीक' (बॉडी लँग्वेज) संवाद हा बऱ्याचदा भन्नाट असतो. फक्त नजरेतूनही संवाद साधता येतो. ज्यांचे ज्यांचे माझ्यासारखे प्रेमविवाह झालेले असतील ते 'नेत्रसंवादा'ची ग्वाही देऊ शकतील! आमच्या कार्पोरेट जगतात 'देहसंवाद' जोखत आम्ही समोरच्याचे 'तळमन' समजण्याचा प्रयत्न करीत असतो. जिव्हा एक बोलते आणि देहबोली दुसरंच सांगते, म्हणजे कुछ तो लोच्या है! संवाद साधत समोरच्याचे मन वाचण्यात कृष्ण खूप पटाईत होता असे म्हणतात. 'मनकवडा' असणारा कृष्ण म्हणूनच 'मनमोहन' होऊ शकला. बरेच पांडित्यपूर्ण बोलणारे वक्ते हे श्रोत्यांची नाळ पकडू न शकल्याने चांगला संवाद साधू शकत नाहीत नि म्हणून श्रोत्यांवर प्रभावही टाकू शकत नाहीत. समूहाची म्हणून एक मानसिकता असते जी ओळखून संवाद साधावा लागतो. काही वक्ते तर संवादकौशल्यातून शेकडो श्रोत्यांना संमोहित करु शकतात नि स्वतःचा बरावाईट कार्यभाग साधू शकतात. अंधश्रद्धा पसरविणाऱ्या भोंदू धार्मिक वक्त्यांची तर ही खासियत असते. अर्थात तर्काने विचार करणारा म्हणजेच स्वतःचा मेंदू वापरणारा कोणताही सुजाण मनुष्य अशा बोगस संवादाला बळी पडत नाही. संवादातून आपण किती 'नम्र' आहोत नि म्हणून 'सच्चे' आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न करणारे काही महाभाग हे सतत कमरेत वाकून अभिवादन करीत असतात. हा असा 'कंबरे'चा नम्र संवाद पहाणे खूपच मनोरंजक असते! या अशा 'इंटरेस्टिंग' पण तितकाच 'डेंजरस' असू शकणाऱ्या 'कंबरबद्ध' संवादाबद्दल लहानपणी मी चार ओळी अशा ऐकल्या होत्या –

**नमन नमनमें फेर है,**
**बहुत नमे नादान.**
**दगाबाज दुगना नमे,**
**चित्ता, चोर, कमान!**

भारतीय समाजांमध्ये 'सुयोग्य संवाद' हा गांभिर्याने घेतलाच जात नाही. मला असे अनुभव पदोपदी येतात. तुम्ही तुमचा निर्णय काहीही घ्या, तुमचे मत काहीही असो, एखादे काम तुम्ही करुही शकत नसाल, तुमच्याकडे एखादी माहिती नसेलही – अरे, परंतु हे कळवायला हवे ना? बऱ्याच महाभागांना वाटते की मी कळवले नाही म्हणजे समोरच्याने समजून घ्यावे! आता या वागण्याला अडाणीपणा म्हणावे की उद्दामपणा? समोरच्याला गृहीत धरण्याची वाईट खोड आमच्या जणुकांमध्ये खोलवर रूजलेली आहे. संवाद अपूरा ठेवत मला गृहीत धरणाऱ्यांना मी संधी मिळताच फाट्यावर मारतो. आपल्या सौजन्यशील स्वभावाला कुणी 'कमजोरी' समजत असेल आणि संवादाच्या बाबतीत गडबड करीत असेल तर रट्टा हा हाणलाच पाहिजे! अर्थात हे सारं सबूरीने. आमच्याकडे बऱ्याचवेळा एखाद्याला कळलं की अमूकतमूक माणूस हा अडचणीत सापडलाय नि म्हणून त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतोय, की लगेच याचा अहंकार जागा होतो. कभी गाडी नावपर, कभी नाव गाडीपर! – हे आयुष्याचं वास्तव आहे. प्रत्येकाची वेळ बदलत राहते. संवादामधला मुजोरपणा म्हणूनच टाळायला हवा. कार्पोरेट जगतातले काही शक्तीमान नि तितकेच उद्दाम असणारे 'वरीष्ठगण' निवृत्ती नंतर संवादाचा जेव्हा केविलवाणा प्रयत्न करीत असतात तेव्हा सुधारण्याची वेळ निघून गेलेली असते. दुसऱ्या बाजूला अतिसज्जन आणि अतिमृदु माणसे ही स्वतःचा पैसा वसूल करताना सुद्धा संवादामध्ये अजीजीचा सूर लावतात. हा तर तद्दन मूर्खपणा म्हणायला हवा. तुमच्या संवादाच्या स्टाईलने लोक तुम्हाला जोखतात नि मग गृहीत धरू लागतात. लाथोंके भूत बातोंसे नहीं मानते ही अनुभवसिद्ध म्हण उगीच प्रचलित झालेली नाही. जिथे संवाद हा आक्रमक असायला हवा, तो तिथे मिळमिळीत असून चालत नाहीच. मुंबईत काही उद्दाम लोकांना मी प्रसंगी आमच्या सोलापूरी संवादाचा हिसका दाखवला आहे! काही लोकांना प्रचंड लांबड लावत बोलायची सवय असते. यांच्याशी संवाद साधताना मी शिताफीने यांना पुन्हा ट्रॅकवर आणत असतो. विविध शहरांमधील विविध समाज समजून घेण्यासाठी मी तिथे गेल्यावर स्थानिक ड्रायव्हर, स्वैपाकी, चपराशी, वॉचमन, हॉटेल मधील रूम बॉय इत्यादींशी संवाद साधत असतो. हा संवाद माझ्या ज्ञानात मोठी आणि खरी भर घालतो!

कपटी लोकांची 'संवाद – कला' ही सहजपणे उमगत नाही. ही सामान्यतः मधुर नि तितकीच संदिग्ध असते कारण अशा लोकांना स्वतःचे कपट उघडे पडू द्यायचे नसते. कपटी लोकांशी संवाद साधण्यापूर्वी त्यांचे जगण्याचे तत्वज्ञान, अन्य लोकांसोबतचे झालेले त्यांचे संवाद व घडलेले कार्यक्रम तपासले पाहिजेत. यासाठी एका सक्षम नेटवर्कची गरज असते. अगदी 'पहुंचे हुए' कपटी लोक हे वाचिक व देहबद्ध संवादामध्ये चलाख संतुलन साधत असतात. परंतु माझ्या अनुभवानुसार ही मंडळी बुद्धिमान तर नसतातच नि खूप घाबरटही असतात. यांच्याशी आपला संवाद मंदगतीने चालू ठेवत यांचा अभ्यास केला पाहिजे. उद्योग – व्यवसायात निरागस शेतकरी हे कपटाला न ओळखता 'खुला संवाद' भावनाशीलतेने करत जातात नि हातोहात फसत जातात. बऱ्याच वेळा संवादाचा इच्छित परिणाम साधण्यासाठी ठंडा करके पिओ सारखी व्यूहनीती वापरावी लागते. काही वेळा

साधेपणाचा आव आणत समोरच्या कपटी व्यक्तीला बेसावध ठेवावे लागते. अशा बेसावधपणातूनच ती चुका करू लागते नि तिचे कपट उघडे पडत जाते. साधारणपणे कमअस्सल मंडळी जी लायकीपेक्षा अधिक यशाची महत्वाकांक्षा ठेवतात ती एका टप्प्यानंतर आपोआपच बटबटीत संवाद करू लागतात. स्वतःच्या अशा गोलमटोल संवादानेच ही मंडळी मग उघडी पडत जातात. बस, इनकी पतंगको थोडा ढील देते जाईए! कपट्यांचा संवाद हा क्लिष्ट भाषेवर व भरमसाठ तपशीलावर आधारित असतो. संकोच न करता आपल्या मुद्द्यांना धरून हा संवाद आपणच सोपा व स्पष्ट केला पाहिजे. संवादातील संदिग्धता ही कपट्यांचे नामी हत्यार असते जे मोडले पाहिजे.

मी बऱ्याचवेळा पाहतो की काही कुटुंबांमधील सदस्यांमध्ये खुला व आनंददायी संवाद नसतो. 'पुरुषप्रधान' रचनेमुळे वडीलधाऱ्या मंडळींना अनाठायी आदर दाखवत कुटुंबातील युवासदस्य व महिला आपल्या संवादाचा संकोच करीत असतात. आजही अनेक परिवारांमध्ये 'कर्त्या' पुरुषांची हुकूमशाही चालते नि म्हणून या तथाकथित संस्कारी परिवारांमधील संवाद हा 'एकतर्फी' असतो. कोणत्याही एखाद्या वरीष्ठ अधिकाऱ्याचे खरे संस्कार तपासायचे असतील तर त्याने कनिष्ठांशी केलेला संवाद तपासावा. कुटुंब, उद्योजकीय कंपनी, राजकीय पक्ष, सरकारी कार्यालये, सांस्कृतिक व धार्मिक संघटना, महाविद्यालये व विद्यापीठे इ. मधील 'अधिकारी' व्यक्तींची 'संवाद शैली' हा मोठ्या रंजक अभ्यासाचा विषय होऊ शकतो. अधिकारविहीन व्यक्तींना बहुतांश वेळा लादलेला संवाद हा सहन करावाच लागतो! असे अन्यायी संवादाचे लादणे सहन करायचे नसेल तर आपल्या पाठीशी 'मोठ्या नेटवर्क'ची मोठी शक्ती असायला हवी. आता या लेखाचा शेवटचा मुद्दा. आपण स्वतःशी खराखुरा संवाद किती, केव्हा आणि कसा साधतो? स्वतःची म्हणून एक निस्पृह चौकशी करायची असते. स्वतःचाच इंटरेस्टिंग असा शोध पुनः पुन्हा घ्यायचा असतो. या स्वतःशी होणाऱ्या संवादाचे नियम असे नसतात. हां, पुरेसा प्रामाणिकपणा मात्र जरूर हवा असतो. स्वतः मध्येच जे बहुतांश वेळ रमलेले असतात, त्यांना हा स्वतःच्या चौकशीचा संवाद स्वतःची स्वमग्नता कमी करण्यासाठी खूप उपयोगी पडू शकतो. निष्कर्ष असा की स्वतःमध्ये रमणे आपण असे थोडे कमी करू शकलो तर इतरांशी चांगला संवाद साधू शकतो, हे निश्चित! ♦

## सहवेदना



आपले सभासद श्री मोहन मधुसूदन मराठे यांच्या मातोश्री मंगला मराठे वय ९४ यांचे वृध्दापकाळाने दि १४-०३-२४ रोजी डोंबिवली येथे दुखःद निधन झाले.

सौ मंजिरी मोहन मराठे या स्नुषा होत त्या मराठे प्रतिष्ठान पुणे शाखे च्या कोषाध्यक्ष आहेत. कै मंगला मराठे यांच्या काही कविता आपल्या हितगुज मध्ये पुर्वी प्रकाशित करण्यात आल्या होत्या.

'मराठे प्रतिष्ठान'चे वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.



# विशेष देणगीदार व जाहिरातदार

**कणकवली येथे संपन्न झालेल्या कुलसंमेलन स्मरणिके करता विशेष देणगीदार व जाहिरातदार ची नावे खालील प्रमाणे.**

**अ) रु. २००००/=**

१) श्री सुरेश राजाराम मराठे हरकूळ,कणकवली.

**आ) रु. ११०००/=**

१) श्री शरद व हेमंत मराठे गोरेगाव व नालासोपारा.
२) श्री दिलीप वसंत मराठे बोरीवली.
३) श्री सदाशिव बळवंत मराठे बडोदा,

**इ ) रु. १००००/=**

१) श्री अजित मराठे बोरीवली.
२) गोमंतकीय मराठे परीवार गोवा.

**ई) रु. ५००१/=**

ब्रिगेडियर श्री विद्धांस डि व्ही पुणे.

**उ) रु. ५०००/=**

१) श्री रघुवीर मराठे बडोदा.
२) श्री कालीदास बा मराठे गोवा.
३) मे वामन शंकर मराठे ज्वेलर्स ठाणे.
४) मे गोखले मराठे असोसिएट पुणे.
५) श्री अच्युत मराठे गया.
६) श्री शिरीष मराठे ठाणे.
७) श्रीनिवास मराठे दादर.
८) श्री पुष्कराज वामन मराठे पुणे,
९) श्री चिंतामणराव मराठे पुणे,

**ऊ) रु. ३०००/=**

१) सर्वश्री अतुल जोशी,
२) मिलींद वैद्य,
३) उत्तम जोशी,
४) मे शैलेश ज्वेलर्स,
५) मे भैरव चेन्स,
६) माणिक जैन,
७) नरेंद्र भाई,
८) हरि भाई,
९) मे य वि मराठे ज्वेलर्स ठाणे,
१०) सुरेश महाजन,
११) प्रवीण भाई,
१२) अशोक वैद्य,
१३) हसमुख भाई,
१४) विश्वास वैद्य दादर,
१५) हरेश भाई,
१६) हसमुख भाई सावला ड्रायफुट
१७) मे एस एस रोड लाईन्स पुणे,
१८) यशवंत मराठे,
१९) नवचैतन्य प्रकाशन बोरीवली.

**ए) रु. २०००/=**

१) सर्वश्री जयंत मराठे दादर,
२) गजानन फडणीस कांदिवली,
३) ज्युईली मराठे विरार,
४) दत्तात्रेय मराठे पुणे,
५) मे मराठे मिल्क प्रॉडक्ट्स माला कर्नाटक,
६) मे पर्पल मँगो रिट्रीट देवगड, मराठे
७) डेन्टल क्लिनिक देवगड.
८) मे किरात ट्रस्ट वेंगुर्ला.

**ऐ) रु. १५००/=**

१) मे वैश्विक लाइफस्टाइल भांडूप,
२) मे प्रसाद पुजा सेन्टर कोल्हापूर,
३) मे देवघर पुणे,
४) सौ शुभदा दिपक मराठे गोवा,

**ओ) रु. १०००/= १००१/=**

१) स्वयंभु मंगल कार्यालय वेंगुर्ला,
२) मे रसकुमारी औषधालय वेंगुर्ला,
३) श्री भानुदास मराठे बडोदा.
४) महेश मराठे नाशिक,
५) संजय खांबेटे,

**औ) रु. २२२२/=**

१) भास्कर मराठे सांगली,

**अं) रु. ५००/=**

१) भास्कर मराठे मिरज,

२) दिलीप मराठे कोल्हापूर,

३) सौ मानसी मराठे गाडगीळ पुणे,

**अः) रु. ३००/=२००/=१००/= ५०/=**

सर्वश्री

किरण मराठे विरार,

योगेन्द्र गोडबोले नाशिक,

जी आर मराठे सांगली,

अशिष मराठे नालासोपारा,

गजानन राव मराठे पुणे,

सौ योगिनी मराठे पुणे,

सौ प्राजक्ता जोशी कुलकर्णी पुणे.

श्री श्रीराम मराठे पुणे,

जयंत मराठे

**सर्व जाहिरातदार व देणगीदार यांच्या सहकार्याने हे संमेलन यशस्वी झाले त्यामुळे त्यांचे मराठे प्रतिष्ठान तर्फे खूप खूप धन्यवाद.**







# मी अनुभवलेले संमेलन

♦ राहुल विद्वांस (पृ. ००), कल्याण

भ्रमणध्वनी : ९५९४०३८४३७

मराठे प्रतिष्ठानचे १२ वे कुल संमेलन दि ६ व ७ जानेवारी २०२४ रोजी दोन दिवसांचे आयोजित केले होते. वाळकेश्वर मंगल कार्यालय हा हॉल खुपच प्रशस्त व सुंदर होता आणि तो सुध्दा निर्सगाच्या सानिध्यात वा.

आम्ही तर ५ तारखेराला दुपारीच कणकवली येथे पोहचलो. दुपारी सुग्रास जेवण झाल्यावर मी व कार्यवाह आम्ही कार्यक्रम स्थळाच्या दिशेने निघालो, मनात एक आतुरता होती व आंनदही. दुपारी ४ वाजता आम्ही सगळे हॉल वर पोहचलो होतो त्यामुळे आम्हीच हॉलचा ताबा घेणार होतो, पण साखरप्यावरून एक आजी आल्या होत्या, वय होते साघारण ७८ वर्ष. त्यांची ऊमेदही एका तरूण मुलीला लाजवेल अशी होती .

चहापानाचा कार्यक्रम झाल्यावर आम्ही आमच्या कामाला लागलो. कोणी काय करायचे व कसे करायचे याच्या सुचना ऐकून मी व अशोक काका, आम्ही सभासद नोंदणी साठी सुरुवात केली. संध्याकाळ सभासद नोंदणी करण्यातच गेली. रात्रीचे जेवण होण्याआधी सर्वांनी एकमेकांशी ओळख करून घेतली आणि व जेवणासाठी गेलो.

मी (अध्यक्ष) विजय काका, (कार्यवाह) हेमंत काका, पुणे सभासद चंद्रशेखर आम्ही पुढच्या कामाला लागलो. आता सर्व कार्यकारिणी सदस्य हे दोन दिवसाचा कार्यक्रम सुरळीत होण्यासाठी पुर्ण प्रयत्न करत होतो.

हा सर्व कार्यक्रम इंद्रधनुष्याच्या सप्तरंगासारखे रंगबीरंगी सुरेल प्रेरणादायी आणि सर्व मराठे कुलपरिवारामधील सदस्यांमध्ये अतुट नातेबंध विणणारा खुपच विलोभनीय संपन्न झाला.

घरी येताना खुप सारी सकारात्मक व एकजुटीची ऊर्जा घेऊनच मी परतलो.

♦









# सहवेदना



कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाच्या धनी सुनंदा मराठे गया, बिहार

सुनंदा मराठे तुमचा लौकिक जगातून पारलौकिक जगात जाण्याचा दिवस म्हणजे तुमच्या ईश्वर भक्ती पुढे, तुमच्या विविध कार्यापुढे, परिवाराला जोडून ठेवण्याचा कौशल्या पुढे नतमस्तक होण्याचा दिवस.

भीष्म पितामह यांनी बाणाच्या शैयेवर असताना इच्छामृत्यू उत्तरायणात स्वीकारले, आपण सुद्धा इच्छा मरण उत्तरायणात मागून घेतले.

तुमच्या नाती म्हणजे = तुमचे सैनिक
तुमचे मुलं म्हणजे = तुमची शक्ती
तुमच्या सुना म्हणजे = तुमचे दोन हात
आणि तुम्ही स्वतः म्हणजे = घराचा आधारस्तंभ .

काशी विश्वनाथ नगरीत विश्वनाथाच्या सानिध्यात राहिल्या नंतर पितृ गया बिहार येथे आल्यानंतर श्राद्धासाठी येणारे विविध जाती, विविध भाषी लोकांशी असे आपुलकीचे वागू लागल्या की त्यांना तुम्ही आपल्या परिवारातल्या भासू लागल्या तुम्ही आपल्या प्रेमळ स्वभावाने, योग्य निर्णय शक्तीने, भारदस्त व्यक्तीमत्वाने, नातं जोडण्याच्या कलेने तुम्ही सर्वांचे मन जिंकले होते. तुमच्या नातींना तुम्ही जे संस्कार दिले ते बघून वाटते आजच्या आधुनिक काळात अशा १०० लोकांचा स्वयंपाक करून वाढू लागणाऱ्या, मंत्र मुग्ध भजन पेटीवर म्हणणाऱ्या, शुद्ध ,गोड, कर्ण मधुर मराठी बोलणाऱ्या या मुली पुण्याच्या मुलींना सुद्धा लाजवतील अशा या तुमच्या नाती कौतुकास पात्र यासाठी की तुम्ही त्यांना लावलेले वळण, तुमच्या आज्ञाधारक सुना आणि तुमचे मुलं तुमचा प्रत्येक शब्द, तुमची आज्ञा पाळणारे मुलं धन्य त्यांना तुम्ही आई म्हणून लाभल्या. नशीबवान सुना त्यांना तुमच्यासारखी सासू मिळाली.

अशा या मितभाषी प्रसन्न वदन सुनंदा मराठे मरणापलीकडे जाऊनही तुम्ही प्रत्येकाच्या मनात जिवंत आहात आणि राहाल.

तुमचा भाऊ -सुधीर जोशी
बडोदा ६३५३७७३८०५
ओम शांती

**मी ज्योत्स्ना राजेंद्र मराठे,** हरकूळ कणकवली येथे रहाते.

खूप छान वाटलं आम्ही एकच दिवस आलो...कारण मुलींच्या परीक्षा होत्या. मी दुसऱ्या दिवसांचे कार्यक्रम चुकवले याची खूप खंत आहे.

पहील्या दिवशी फारशा ओळखी झाल्या नाहीत माझ्या कोणाशी मात्र ह्या संमेलनामुळे माझे मामा मला पहिल्यांदा भेटले याचा खूपच आनंद झाला आहे. श्री नागेश मराठे. कुटुंबाचा आधार असल्याची भावना मनात निर्माण झाली. आम्ही एकटे नाही असे वाटले.

परत भेटूच... दुर्गला पुढील संमेलन भरवा, आम्ही येऊ नक्कीच.

**सौ. ज्योत्स्ना राजेंद्र मराठे** हरकूळ कणकवली.
भ्रमणध्वनी ९४२०२६१२३३


VAISHVIK
Corporate
Uniform
Manufacturer

T-Shirts

Shirts

Hoodies

Trackpant
RAJESH MADHAV MARATHE
9619866226
vaishviklifestyle@gmail.com
Factory
Gala No.3, Vasant Dhanaji Estate, LBS Marg, Bhandup (W), Mumbai - 78

# तो

◆ अंजली आशुतोष मराठे, बडोदे, गुजरात

कुणी रेखिले आभाळावर
रंगबिरंगी चित्र मनोहर
कुणी ओतले मुग्ध कळ्यांवर
फुल-वेलींवर सुगंध अत्तर

खोल तळाशी निळ्या सागरी
कुणी लपविले मोती सुंदर
कुणी पसरले धरणीवरती
रुक्ष कोरडे कितीक कंकर

हिरवाईने नटली सजली
वनराई ही नितांत सुंदर
कडेकपारीतुनी वाहती
शुभ्रधवल खळखळते निर्झर

कुणी निर्मिले अजस्त्र प्राणी
कुणी निर्मिले सूक्ष्म जीव हे
कोण देतसे रंग रूप त्यां
अन प्राणांची घाली फुंकर

दिवस रात्र महिने वर्षाचे
कोण ठरवितो वेळापत्रक
चंद्र सूर्य अन तारे येती
निश्चित केलेल्या वेळेवर

कुणी लपविली स्वप्न लोचनी
कोण जागवी मनात आशा
कोण करवितो सुख-दु:खांचे
जीवनात ते भास समांतर

कोण ठरवितो किती असावे
एक एक श्वासाचे अंतर
कोण चालवी जन्म मृत्युचे
सृष्टीचे हे चक्र निरंतर

कुणा न दिसले कुणा न कळले
अवती भवती तरी भासले
चरा-चरातिल चैतन्यच ते
म्हणती त्याला सारे ईश्वर

◆

---



**माझा मोठ्ठा भाऊ शरद अरुण मराठे याने आयत्या वेळी उपस्थित राहुनही या संमेलनाचे उत्कृष्ट छायाचित्रण केले व गुगल लिंक तयार करून त्यावर सगळी छायाचित्रे संमेलन संपल्यावर लगेच उपलब्ध केली. खरं तर शेवटपर्यंत त्याचं येणं नक्की नव्हते कारण तिकीट कन्फर्म झाले नाही. तरीही आयत्या वेळी साध्या तिकीटावर रात्रभर प्रवास करुन सकाळी १०च्या दरम्यान संमेलन स्थळी उपस्थित राहिला व स्वत:हून सगळी छायाचित्रणाची जबाबदारी स्वीकारली व यशस्वी पणे पार पाडली. मराठे प्रतिष्ठान कायम या ऋणामधे राहील.**

**– हेमंत अरुण मराठे**

**नमस्कार मंडळी**

कणकवली स्नेहसंमेलन आटोपल्यानंतर गोवा येथे जाऊन मुंबई मार्गे कालच अमरावतीला घरी परतलो.

पारिवारिक संमेलन यशस्वी करण्यात परिश्रम घेणाऱ्या आयोजन समितीचे मनःपूर्वक अभिनंदन.

अतिशय कमी वेळात मोठ्या शहरापासून दूर निसर्गाच्या कुशीत वसलेल्या कणकवली येथे अधिवेशन आयोजित करणे तसे अवघडच होते परंतु प्रतिष्ठानचे विजयराव, हेमंतजी, श्रीनिवासजी शैलेंद्रजी यांच्या परिश्रमाने आणि त्यांच्या मार्गदर्शनात सदस्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच संमेलन यशस्वी झाले.

नागपूर, औरंगाबाद, अमरावती या लांबच्या शहरातून सदस्य आले परंतु पुणे, ठाणे, मुंबई येथील सदस्याची कमी उपस्थिती प्रामुख्याने जाणवली. त्यांची उणीव भासली.

सदस्य पोहोचल्यापासून ते निरोप समारंभापर्यंत आयोजन समिती सक्रिय होती.

निवास, चहापाणी, भोजन व्यवस्था उत्तमच. जेवणात कोकणी पदार्थांचा आस्वाद घेता आला कॅटररनी दिलेल्या सुग्राज जेवण लाजवाब होते.

संमेलनात मजा आणली ती सांस्कृतिक कार्यक्रमाने. कणकवलीकर मराठे लिखित, दिग्दर्शित, संगीतबद्ध केलेली एकांकिका मस्तच झाली. एकांकिका विषय देखील सामाजिक स्थितीचे दर्शन घडविणारा होता.

संगीत कार्यक्रमाला तर तोडच नव्हती. बालकलाकारांपासून ज्येष्ठांपर्यंत झालेली बहारदार गाणी तसेच नृत्य आनंददायी होते.

ग्रुप फोटो घेण्याची विनंती कार्यकारिणीने अमलात आणली त्याबद्दल धन्यवाद.

**पुनश्च एकदा कणकवली संमेलन यशस्वी करण्यात परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक CT अभिनंदन**

**– डॉ. प्रमोद अरुण मराठे**, अमरावती

भ्रमणध्वनी ९४२३८०५८५४




















**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४२२७ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org**
• वेबसाईट : **www.marathepratishthan.org**